महाराष्ट्र शासन

वैद्यकिय अधिक्षक यांचे कार्यालय

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रूग्णालय

सातपुर नाशिक – ४२२००७.

Email ID : nashik.esis@gmail.com दूरध्वनी क्र ०२५३२३५१०४५/२३५१११४

जा.क्रं. राकावियो/रूग्णा.नाशिक/निर्लेखन विभाग/निकामी हायपोसोल्युशन /6684-86 /२०२५ दि.

03 OCT 2025

# दरपत्रके सुचना / निविदा संच

वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा सोसायटी रूग्णालय, नाशिक यांचे कार्यालयातील निकामी हायपोसोल्युशनच्या चांदीचे प्रमाण प्रति लीटर हे व वरिष्ठ वैज्ञनिक अधिकारी,उपसंचालक,आरोग्य प्रयोगशाळा,पुणे यांचेकडुन निश्चित केल्यानुसार प्रती लीटर प्रमाणे विक्री करावयाचे असुन सदर खरेदीसाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) यांनी हायपोसोल्युशनची विल्हेवाट (घातक कचरा विल्हेवाट) संबंधी Standard operating system कार्यपध्दत विहित केलेली असल्याने असे विशिष्ट मान्यताप्राप्त परवानाधारकांकडुन निविदा संच मधील नमुद अटी व शर्तीनुसार दोन लिफाफा पध्दतीने अधिकतम दराचे दरपत्रक बंद पाकीटात मागविण्यात येत आहेत.

निकामी हायपोसोल्युशन तपशील

| अनु.क्र | निर्लेखित निकामी साहित्य प्रकार | निकामी हायपोसोल्युशनची ठरविण्यात आलेली अपसेट किंमत |
|---|---|---|
| १ | निकामी हायपोसोल्युशन | रू.२१०/– प्रति लीटर |

टिप:– मा.आयुक्त महा–राकाविसो,मुंबई यांचेकडील मार्गदर्शक तत्वे व शासन निर्णय दिनांक ३१.१०.१९९५ नुसार अपसेट किंमत ठरविण्यात आली आहे.

## दरपत्रके सादर करण्याचा तपशील

१.दरपत्रके विक्रीसाठी उपलब्ध दिनांक व वेळ :– दि.६.१०.२०२५ ते १४.१०.२५ दु.३.०० वाजेपर्यंत

२.दरपत्रक सादर करावयाचा पत्ता :– वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा सोसायटी रूग्णालय,सातपुर,नाशिक

३.दरपत्रक स्वीकृती अतिंम दिनांक वेळ:– दि.१४.१०.२०२५ वेळ दु.५.०० वाजेपर्यंत

४.तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक:– दि.१५.१०.२५ शक्य झाल्यास

५.दरपत्रक लिफाफा उघडण्याचा दिनांक:– दि.१५.१०.२५

जाहिर दरपत्रके मध्ये सहभाग घेण्याकरीता निविदा फी किंमत रू.२०००/– ना–परतावा ऑनलाईन जमा करून दि.६.१०.२५ ते दि.१४.१०.२०२५ रोजी ५.०० वाजेपर्यंत व वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा सोसायटी रूग्णालय,सातपुर,नाशिक येथे हजर राहुन नावनोंदणी करून अटी व शर्ती समजुन घेण आवश्यक राहील.तसेच सदर दरपत्रके सादर करण्यासाठी MAHARASHTRA EMPLOYEES STAE INS SOC A/C No-38629844178 , IFS Code SBIN0061401यांचे नावे परतावा रक्कम रू.१००००/– NEFT, राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष , डिमांड ड्राफट स्वरूपात बयाणा रक्कम भरणे आवश्यक आहे.

# अटी व शर्ती

1) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) व परमाणु उर्जा नियामक मंडळ (AERB) यांची संमती / परवाना घेतलेल्या निविदाधारकांचाच निविदेसाठी विचार केला जाईल.(संमती व परवानगीची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.)

२.केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचे मार्गदर्शक कार्यपध्दती नुसार विविध प्रकारचे घातक कच--याची विल्हेवाट (Hazardous wastes disposal) Standard operating system) प्रमाणे निश्चित केलेल्या विहित कार्यपध्दतीनुसार विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ,नवी दिल्ली यांचेकडील Standard operating procedure for utilization of hazardous waste under Rule of hazardous & other wastes management & transboundary movement Rules 2016- utilization of spent fixer (hypo solution) मध्ये विहित कार्यपध्दत निश्चित केलेली आहे. या कार्यपध्दती प्रमाणे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांचेकडील अधिकृत परवानाधारक निविदेप्रक्रियेत सहभाग घेता येईल.

३.तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचेकडील Authorization under Hazardous & other waste (Management & Transboundary movement) Rules 2016 & Amendment there to with Authorization for processing, recycling & recovery of Hazardous waste one time Authorization for import of hazardous waste as per part-D D,Schedule-iii Authorization to transporters for transportation of hazardous waste through vehicle in the state of Maharashtra under rule 18 याप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे परवानाधारक निविदा प्रक्रियेत सहभाग घेता येईल.

४.निकामी हायपोसोल्युशन वाहुन नेण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाचा (RTO) यांचेकडील घातक कच--याची वाहतुक परवाना आवश्यक असल्यास तो असणे आवश्यक आहे.

5) यशस्वी निविदाधारकाला कचरा हायपो सोल्यूशन जमा करण्यापूर्वी ESIS हॉस्पिटल सातपूर, नाशिकला १०० टक्के पेमेंट करावे लागेल.

6) निविदेची वैधता - लिफाफा क्रमांक २ उघडल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांपर्यंत (सहा महिने) निविदा स्वीकृतीसाठी खुली ठेवली जाईल.

7) दराचे कोटेशन काटेकोरपणे रुपये/लिटर द्रावणात असावे.

8) निविदासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या प्रती योग्यरित्या साक्षांकित किंवा स्वयं साक्षांकित असाव्यात.

9) निविदा शुल्क २०००/- रुपये (फक्त दोन हजार) कार्यालयात **NEFT** द्वारे जमा करावे

10) निविदेत सहभागी होण्यासाठी **ईएमडी (निविदा बयाणा रक्कम) शुल्क रू.१००००/-- (फक्त दहा हजार रुपये) या कार्यालयात भरणा करावा लागेल.**

11) यशस्वी निविदाधारकाला फक्त १०,०००/- रुपये सुरक्षा ठेव हायपोसोल्युशनची अतिंम प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरणा करणे आवश्यक राहील.

अ) सुरक्षा ठेव सहा महिन्यांनंतर अगर हायपोसोल्युशनची अतिंम कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

12) निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निविदाधारकाकडून काही चूक झाल्यास ईएमडी आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल आणि ती महाराष्ट्र राज्यपालांच्या खात्यात जमा केली जाईल.

13) ऑर्डरच्या अंमलबजावणीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय निविदा समितीकडे राहील आणि दर आठवड्याला २% विलंब शुल्क आकारले जाईल. कोणत्याही किंमतीत ५ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी अशी मुदतवाढ दिली जाणार नाही.

14) निविदा फॉर्म सादर करण्याच्या सूचना खालीलप्रमाणे

अ) लिफाफा क्रमांक-१ (तांत्रिक बोली)

स्वाक्षरी केलेल्या परिशिष्ट १ मधील अ.क्र १ ते १४ कागदपत्रांच्या प्रती सोबत जोडण्यात याव्यात व ते सीलबंद करावेत. या लिफाफ्यावर ठळक अक्षरात 'लिफाफा क्रमांक 1 (तांत्रिक बोली)' असे स्पष्टपणे लिहिलेले असावे.

ब) लिफाफा क्रमांक-२ (व्यावसायिक बोली)

निविदादाराने या लिफाफ्यात योग्यरित्या भरलेले आणि लेटरहेडवर स्वाक्षरी केलेले परिशिष्ट क्रमांक-2 जोडावे आणि ते सील करावे. या लिफाफ्यावर ठळक अक्षरात 'लिफाफा क्रमांक २ (व्यावसायिक बोली)' असे स्पष्टपणे लिहिलेले असावे.

क) एकाच लिफाफा क्रमांक ३ मध्ये वरीलप्रमाणे सीलबंद तांत्रिक क्र.०१ आणि व्यावसायिक लिफाफा क्रमांक 2 असे दोन्ही सीलबंद लिफाफा हे सील करा लिफाफा क्र.३ मध्ये समाविष्ट करून सीलबंद करावा.

~~खालील माहिती~~ -

१५.अधिक दराची निविदा स्वीकारण्यात येईल.

१६.निविदाधारकाची कोणत्याही स्वरूपाची अट मान्य केली जाणार नाही.

१७.यशस्वी निविदाधारक महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचेकडील अधिसुचना दि.१७.९.२०२५ नुसार विहित शुल्क महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) भरणे आवश्यक आहे.

१८.जास्त दराची निविदाधारकाची निविदा स्वीकृत झाल्यानंतर निकामी हायपोसोल्युशनची किंमत /एकुण रक्कमेचा भरणा करणेबाबत यशस्वी निविदाधारकास कळविले जाईल. यशस्वी निविदाधारकांनी हायपोसोल्युशनची विक्रीची रक्कम त्वरित रूग्णालयाच्या बॅक खाती जमा करावी.सुचनेप्रमाणे विहित मुदतीत रक्कम जमा न केल्यास बयाणा रक्कम जप्त केली जाईल व पुढील कार्यवाही केली जाईल.

१९.यशस्वी निविदाधारकाने निकामी हायपोसोल्युशन स्व--खर्चाने कार्यालयीन ७ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेमध्ये घेंवुन जायचे अन्यथा प्रतिदिवस रू.१००/— दंड आकारण्यात येईल.

२०.निरूपयोगी साहित्य ताब्यात घेताना रूग्णालयाच्या इमारतीचे मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदारास नुकसानीबाबत जबाबदार धरण्यात येईल व झालेल्या नुकसानीच्या वसुली संबंधितांकडुन करण्यात येईल.

२१.खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकाराचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील यातुन कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

२२.खरेदी प्रकियेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याचे क्षेत्र नाशिक राहील.

२३.विक्री मुल्यावर नियमानुसार सेवा व वस्तु कर जीएसटी भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

२४.निरूपयोगी साहित्य स्वत:च्या जबाबदारीवर घेवुन जावे लागेल.त्याकरीता कोणतेही वाहतुक व अन्य रक्कम देय राहणार नाही.

२५.दरपत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी असणे बंधनकारक राहील,स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

२६.सदर निविदाप्रक्रिया राबविताना शासनाचे विहित प्रचलित नियम,अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहील.

27)यशस्वी निविदाधारक महाराष्ट्र राज्यातील नाशिक येथील ईएसआयएस हॉस्पिटल सातपूर येथून हायपो सोल्यूशन जेथे असेल तेथे आणि जेथे असेल त्या आधारावर गोळा करतील.

28) हायपो सोल्यूशन विक्री स्पर्धात्मक वाढीव दराने विकले जाईल.

29) निविदाधारकाला नाशिक येथील ईएसआयएस रुग्णालय सातपूरच्या कार्यालयाकडून ऑर्डर मिळाल्यानंतर एका आठवड्याच्या आत स्वतःच्या कंटेनरमधून आणि स्वतःच्या खर्चाने हायपोसोल्युशन त्या ठिकाणाहून गोळा करावे लागेल.

30) वैद्यकीय अधीक्षक महाराष्ट्र ईएसआयसी सोसायटी नाशिक. कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

श्री.डॉ.बी.एन.पावरा
वैद्यकिय अधिक्षक
रा.का.वि.सो रुग्णालय सातपूर नाशिक

प्रति,
१.रोखपाल विभाग यांच रूग्णालयातील यांनी नोंदणी शुल्क घेवुन फॉर्म विक्रीसाठी व बयाणा रक्कम घेण्यासाठी पुढील कार्यवाहीसाठी
२. नोटीस बोर्ड याच रूग्णालयातील सर्व पुरवठाधारकांना माहितीसाठी

प्रतिलिपी
१.मुख्य कार्यकारी अधिकारी, १ला माळा,राकावियो रूग्णालया वरळी इमारत,गणपत जाधव मार्ग,वरळी,मुंबई—४०० ०१८

# परिशिष्ट—१

## दरपत्रक तांत्रिक लिफाफा अर्ज दि.

प्रति,
वैद्यकीय अधीक्षक,
राकाविसो रूग्णालय
सातपुर,नाशिक—४२२००७

विषय:—दरपत्रकासाठी तांत्रिक दस्तवेज पाकीट सादर
संदर्भ:— जा.क्रं. राकावियो/रूग्णा. नाशिक/ निकामी हायपोसोल्युशन/ /२०२५
दि.

महोदय,

वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा सोसायटी रूग्णालय सातपुर नाशिक यांचेकडील जाहीर सुचना जा. क्रं. राकावियो/रूग्णा. नाशिक/निकामी हायपोसोल्युशन/ /२०२५ दि. मधील अटी व शर्ती मला मान्य आहे त्यानुसार निकामी हायपोसोल्युशन साहित्य खरेदी करण्याकरीता मी खालीलप्रमाणे दस्तावेजच्या छायांकित प्रती सादर करीत आहे.

| अनु. क्र. | दस्तवेज | जोडलेले आहे किंवा नाही | पेज क्र. |
|---|---|---|---|
| १ | केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांचे प्रमाणपत्र अट क्र.२ नुसार | | |
| २ | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचे प्रमाणपत्र अट क्र.३ नुसार | | |
| ३ | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ४ | प्रादेशिक परिवहन विभागाची (RTO) यांचे घातक कच—याची वाहतुक परवानाची प्रत | | |
| ५ | पॅन कार्डची प्रत संस्थेच्या नावाची | | |
| ६ | प्रवेश फी रक्कम रू.२०००/— | | |
| ७ | बयाणा (EMD) रक्कम रू.१००००/— | | |
| ८ | संस्थेचे नोंदणीचे प्रमाणपत्र | | |
| ९ | इनकम टॅक्स रिर्टन सन २०२१—२२,२०२२—२३ २०२३—२४ या तीन वित्तीय वर्षाच्या आयकर भारणा करल्याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| १० | बॅकेचा रद्दद् केलेला चेक | | |
| ११ | आधारकार्डची छायांकित प्रत | | |
| १२ | संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र . | | |
| १३ | अटी व मान्य असल्याचे निविदाधारकाची सही | | |
| १४ | संस्था काळया यादीत नसल्याबाबतचे हमीपत्र | | |

वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहे.

पुरवठादाराचे नाव/फर्मचे नाव.............................
स्वाक्षरी...................................,.....................
टपाल पत्ता..................................................
..................................................
....................................

भ्रमणध्वनी क्र...............................
दुरध्वनी क्र..................................
इ—मेल ..................................................
पुरवठादाराचा शिक्का..................................

# परिशिष्ट—२

दरपत्रक व्यापारी लिफाफा / वित्तीय दराचा लिफाफा    दि.

प्रति,
वैद्यकीय अधीक्षक,
राकाविसो रूग्णालय
सातपुर,नाशिक—४२२००७

निकामी. हायपोसोल्युशन तपशील

| अनु.क्र | निर्लेखित निकामी साहित्य प्रकार | सर्व करांसहित दर |
|---|---|---|
| १ | निकामी हायपोसोल्युशन | |

पुरवठादाराचे नाव/फर्मचे नाव..........................
स्वाक्षरी...................................................
टपाल पत्ता...............................................
...............................................
...................................
भ्रमणध्वनी क्र..............................
दुरध्वनी क्र.................................
इ—मेल ..............................................
पुरवठादाराचा शिक्का................................